**<u>प्रतिवादी क्र. १३ब ते १३फ तर्फे विधिज्ञ श्री.एस.जी.पणदुरकर यांचेमार्फत साक्षीदाराचा जादा सरतपास शपथेवर सुरु-</u>**

१३अ सिताबाई ही माझी आई आहे. १३ब विदिता, १३ड गितांजली, १३ ई संजना व १३फ माधवी या माझ्या बहिणी आहेत. माझी आई व माझ्या बहिणी यांनी मला त्यांचे वतीने सदरचा दावा चालविणेकरिता दि. ३०/०७/२००४ रोजी कुलअखत्यारपत्र करुन दिलेले आहे. सदरचे कुलअखत्यारपत्र कार्यकारी दंडाधिकारी सावंतवाडी यांचेसमक्ष करणेत आलेले आहे. सदर कुलअखत्यारपत्र मी याकामी हजर केलेले आहे. (साक्षीदारास निशाणी <u>१६८ लगत</u> दाखल असणारे मूळ कुलअखत्यारपत्र दाखविणेत आला.) आता मला दाखविणे आलेले कुलअखत्यारपत्र हे तेच आहे. त्यावर माझी तसेच माझ्या बहिणीची सही असून माझ्या आईचा अंगठा निशाणी आहे. सदरचे कुलअखत्यारपत्रातील मजकूर खरा व बरोबर आहे. सदर कुलअखत्यारपत्र हे कार्यकारी दंडाधिकारी यांचेसमक्ष करणेत आलेले आहे. त्यामुळे त्यावर त्यांची सही व शिक्का आहे.

दावा मिळकती या केशव शिवराम मुळीक, वासूदेव गुणाजी मुळीक व विष्णू राघो मुळीक यांनी या मिळकती बाबाजी सखारा पेडणेकर यांचेकडे दि.२१/०३/१९४२ रोजी गहाणपट्टयाने गहाण ठेवलेल्या होत्या.सदर मूळ गहाणपट्टा मी याकामी हजर केलेला आहे. (साक्षीदारास निशाणी १६५/१ लगत दाखल असणारा मूळ गहाणपट्टा दाखविणेत आला.) आता मला दाखविणेत आलेल्या गहाणपट्टयावर केशव वासूदेव विष्णू मुळीक यांच्या सहया आहेत. मूळ गहाणपट्टा हा मोडी भाषेतील आहे. (प्रतिवादी क्र. १३ ब ते १३ फ तर्फे विधिज्ञ यांनी सदर दस्तास निशाणी देणेबाबत विनंती केली. वादीतर्फे विधिज्ञ यांनी सदर दस्तास निशाणी देणेस आक्षेप नोंदविली. न्यायालयात उपस्थित असणारा साक्षीदार हा सदर दस्तास उपस्थित असलेला पक्षकार नाही. सदर साक्षीदारान्वये नोंदविणेत आलेला सदर दस्ताबाबतचा पुरावा विचारात घेता, तो प्रत्यक्षदर्शी साक्षीदार

नाही. सबब, सदर दस्तास निशाणी देणे न्यायोचित नाही. सबब, सदर दस्तास निशाणी देणेत येत नाही.) (प्रतिवादी क्र. १३ ब ते १३फ तर्फे विधिज्ञ यांनी सदरचा दस्त हा ३० वर्षापेक्षा अधिक कालावधीपेक्ष जुना दस्त असलेमुळे आर्टिकल देणेबाबत विनंती केली. वादीतर्फे विधिज्ञ यांनी आर्टिकल देणे ही पध्दत अस्तित्वात नाही. सदरचा दस्त कोणाकडून साक्षीदाराकडे आला हे स्पष्ट नाही या कारणाकरिता भारतीय पुरावा कायदा कलम ९० नुसार सदर दस्तास निशाणी अथवा आर्टिकल देता येणार नाही असे कथन केले. साक्षीदाराने सदरचा दस्त हा सन १९४२ साली करणेत आलेला आहे असे कथन केलेले आहे. तसेच साक्षीदाराने सदर दस्त हा मोडी भाषेत नोंद केलेला आहे असे कथन केलेले आहे. मोडी भाषेतील भाषांतरित प्रतिबाबत आजतागायत साक्षीदार तपासणेत आलेला नाही. अशा परिस्थितीमध्ये निशाणी १६५/१ लगत दाखल असणाऱ्या दस्तामध्ये नेमका काय मजकूर नमूद आहे हे न्यायालयासमक्ष स्पष्ट नाही. अशा परिस्थितीमध्ये न्यायालयास सदरचा दस्त हा सन १९४२ सालातील दस्त आहे असे गृहित धरता येणार नाही. सबब, सदर दस्तास आर्टिकल देणेबाबत प्रतिवादीची विनंती नाकारणेत आली. )

दि.२१/०३/१९४२ रोजीच्या मूळ मोडीभाषेतील गहाणपट्टयाचे भाषांतर मी विठठ्ल आत्माराम केसरकर यांचेकडून करुन घेतलेले आहे. सदर भाषांतरित प्रत देखील याकामी हजर केलेली आहे. (साक्षीदारास निशाणी १६५/१ लगत मूळ गहाणपट्टयासोबत हजर केलेली भाषांतरित प्रत दाखविणेत आली.) आता मला दाखविणेत आलेली प्रत ही तीच आहे. विठ्ठल आत्माराम केसरकर हे साधारणपणे १० ते १२ वर्षापूर्वी मयत झालेले आहेत. विठ्ठल आत्माराम केसरकर हे तहसिलदार कार्यालय सावंतवाडी येथे बसून काम करत असत. माझ्या वडीलांनी विठ्ठल केसरकर यांचेकडून दि.२१/०३/१९४२ रोजीच्या मूळ गहाणपटट्याचे भाषांतर करुन घेतलेले

आहे. माझे वडील देखील मयत झालेले आहेत. विठ्ठल केसरकर यांना मराठी व मोडीभाषा ज्ञात होती. त्यामुळे माझ्या वडीलांनी त्यांचेकडून भाषांतर करुन घेतलेले होते. विठ्ठल केसरकर यांना वारस आहेत का याची मला आजमितीस माहित नाही.

दि.१५/०६/१९५० रोजी बाबाजी सखाराम पेडणेकर याने माझ्या वडीलांना व माझे काका गोपाळ कृष्णा रेडकर यांना गहाणाचे बेचेन पत्र लिहून दिलेले आहे. मी ते मूळ बेचेन पत्र याकामी हजर केलेले आहे. ते मूळ बेचेन पत्र मी वाचलेले आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. सदर बेचेन पत्रावर माझे वडील व माझे काका यांच्या सहया आहेत. मी माझ्या वडीलांची सही ओळखतो. मी माझ्या काकांची देखील सही ओळखतो. (वादीतर्फे विधिज्ञ यांनी सदर दस्तास निशाणी देणेस हरकत नोंदविली. प्रतिवादीतर्फे विधिज्ञ यांनी सदर दस्त हा ३० वर्षापेक्षा अधिक कालावधीचा जुना दस्त आहे. सबब, त्यास भारतीय पुरावा कायदा कलम ९० प्रमाणे निशाणी देणेस विनंती केली. साक्षीदाराने सरतपास कथन केलेला दस्त विचारात घेता, सदरचा दस्त हा त्याचे वडील रामा रेडकर यांनी केलेला आहे असे कथन केलेले आहे. साक्षीदाराने यापूर्वी माझे वडील झालेले आहेत.सदर दस्त हा दि. १५/०६/१९५० रोजी केलेबाबतची तारीख दस्तात नमूद आहे. सदरच दस्त हा ३० वर्षापेक्षा अधिका कालावधी असणारा जुना दस्त आहे. सबब, त्यास निशाणी देणे क्रमप्राप्त आहे.) सबब, सदर दस्तास केवळ ओळखीकरिता **निशाणी क्र. ३१६** देणेत आली.

**न्यायालयाची वेळ संपल्याने उलटतपास पुढील तारीखेपर्यंत तहकूब.**

सही/-
(श्रीमती दुर्गा प्र.पुजारी)
दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),सावंतवाडी.

दि.१६/१२/२०२३.